## उपविभागीय अधिकारी शिर्डी   भाग शिर्डी   यांचे कार्यालय, जिल्हा अहिल्यानगर
## महसूल सेवक (कोतवाल)) संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात 2025
## जाहिरात क्रमांक 02/2025

**अहिल्यानगर** जिल्हयातील **शिर्डी** उपविभागातील **कोपरगांव** तालुक्यातील सजेतील महसूल सेवक (**कोतवाल**)) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**मा. शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि. 17 मे 2023 अन्वये सन 2025 - महसूल सेवक (कोतवाल) पदभरती बाबत महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80 टक्के मर्यादेत पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे.**

**कोपरगाव** तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) रिक्त पदे :- 12
(80% प्रमाणे भरावयाची पदे **10 पदे** )

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 08/07/2025 रोजी पासून | दिनांक 18/07/2025 रात्री 23.59 पर्यंत |

**ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** 18/07/2025

महसूल सेवक (कोतवाल) भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, **शिर्डी भाग शिर्डी** यांना राहतील.

दिनांक :- 07/07/2025

**सदस्य सचिव**
**तालुका निवड समिती**
**तथा तहसिलदार कोपरगांव**

**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी**

**उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालय, जिल्हा अहिल्यानगर**
**महसूल सेवक (कोतवाल)) संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात 2025**
**जाहिरात क्रमांक 02/2025**

**अहिल्यानगर** जिल्हयातील **शिर्डी** उपविभागातील **कोपरगांव** तालुक्यातील सजेतील महसूल सेवक (**कोतवाल**)) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**मा. शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि. 17 मे 2023 अन्वये सन 2025 - महसूल सेवक (कोतवाल) पदभरती बाबत महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80 टक्के मर्यादेत पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे.**

**कोपरगाव** तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) रिक्त पदे :- 12
(80% प्रमाणे भरावयाची पदे 10 **पदे** )

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 08/07/2025 रोजी पासून | दिनांक 18/07/2025 रात्री 23.59 पर्यंत |

**ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** 18/07/2025

महसूल सेवक (कोतवाल) भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, **शिर्डी भाग शिर्डी** यांना राहतील.

**रिक्त पदांचा तपशील**

1) **<u>महसूल सेवक (कोतवाल)</u>** (दरमहा मानधन रक्कम रु. 15,000/-(रुपये पंधरा हजार फक्त)इतके शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण - 2022/प्र. क्र. 191/ ई- 10 दिनांक 06/04/2023

| अ. क्र. | तालुका | सजा | सजेतील गांवे | सजेस असलेले आरक्षण | समांतर महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | कोपरगांव | रवंदे | रवंदे | अनुसूचित जाती | |
| 2 | कोपरगांव | चासनळी | चासनळी, वडगांव, बक्तरपुर | अनुसूचित जाती | |
| 3 | कोपरगांव | संवत्सर | संवत्सर | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती (महिला ) |
| 4 | कोपरगांव | येसगांव | येसगांव, नाटेगांव, खिर्डीगणेश, आंचलगांव | अनुसूचित जमाती | |
| 5 | कोपरगांव | मळेगांव थडी | मळेगांवथडी, सांगवीभूसार | इतर मागास प्रवर्ग | |
| 6 | कोपरगांव | कोकमठाण | कोकमठाण | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग (महिला) |
| 7 | कोपरगांव | चांदेकसारे | चांदेकसारे, घारी | सामाजिक अणि शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग | |
| 8 | कोपरगांव | ब्राम्हणगांव | ब्राम्हणगांव, टाकळी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 9 | कोपरगांव | करंजी बु. | करंजी बु. ओगदी | सर्वसाधारण | |
| 10 | कोपरगांव | माहेगांव देशमुख | माहेगांव देशमुख | सर्वसाधारण | सर्वसाधारण (महिला) |

**टिप:** पदांच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र. पीकेए/1051/ल-6, दिनांक 07/05/1959 **व शासन निर्णय क्रमांक केओटी**-2012/ **प्र. क्र.** 432/**ई**-10 **दि.** 5 **स्पटेबर** 2023 प्रमाणे कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबत अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील. तसेच महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.

1) महसूल सेवक (कोतवाल) भरतीसाठी उमेदवारांचे वय दिनांक 07/07/2025 रोजी 18 ते 40 **या** वयोगटातील असावे.
2) अर्जदार यांनी ज्या **सजेतील पदासाठी** अर्ज सादर केला आहे, त्याच सजातील अंतर्भूत असलेल्या गावांमधील अर्जदार रहिवासी असणे आवश्यक आहे.त्याबाबतचा पुरावा अर्ज भरतेवेळी आवश्यक राहील.
3) महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता 4 थी पास इतकी असावी.
4) अर्जदार हा महसूल सेवक (कोतवाल) पदाची कर्तव्ये पार पाडण्यास शारीरिकदृष्टया सक्षम असावा.
5) मागासवर्गीय उमेदवाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.
6) अर्जदार व्यक्ती विरुद्ध कोणत्याही गुन्ह्याची नोंद झालेली नसावी अथवा उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचा दाखला छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.
7) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दिनांक 28/02/1974 नुसार महसूल सेवक (कोतवाल) म्हणून नेमणूक करतांना इतर सर्व गोष्टी बरोबर असतील तर त्या सजेतील पुर्वीच्या कोतवालांच्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. तसेच कोतवालांच्या वारसाव्यतिरिक्त इतर दोन उमेदवारांचे अंतिम गुण सारखे असल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 13 जुन 2018 मधील नमुद निकषावर लावला जाईल.
8) महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी नियुक्ती देण्याकामी उमेदवारास लेखी परीक्षेत किमान 40 गुण मिळवणे आवश्यक असेल.
9) अर्जदार उमेदवारास वर नमुद केलेल्या पात्रतेसह लेखी **किमान** गुणवत्ता प्राप्त करावी लागेल.
10) उमेदवारांना लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे **मुळ कागदपत्रे तपासणीकामी तात्पुरती** निवड यादी **संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल** तसेच कागदपत्रे तपासणी अंती अंतिम निवड यादी **संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल**.

11) उमेदवारांना लेखी परिक्षेला व कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

12) उमेदवार अनुसुचित जाती/जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवारा व्यतिरिक्त असल्यास अशा उमेदवारांना प्रगत उन्नत गटात मोडत नसलेबाबत सक्षम अधिका-याचे (नॉन क्रिमीलेअर) दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्र छाननीचे वेळी जोडणे आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

13) भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

14) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक कोतवा/२०२३/प्र.क्र.१०२/ई-१०, दिनांक २ जून २०२५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमुना ‘अ’ सादर करणे बंधनकारक राहील.

15) अर्ज पूर्ण माहितीसह व अचूक भरावा, त्यात नमूद करणेत आलेली सर्व माहिती खरी असणे बंधनकारक आहे.

**परिक्षेचे स्वरुप**

| **अ.क्र** | **पदनाम / संवर्ग** | **लेखी परिक्षेसाठी गुण** |
|---|---|---|
| 1 | **महसूल सेवक (कोतवाल)** | 100 |

**<u>लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम</u>**

लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.(प्रश्न संख्या 50)

1) महसूल सेवक (कोतवाल) पदाची लेखी परीक्षा सामान्यज्ञानावर आधारीत असेल.
2) उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळप्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

1. उमेदवारास लेखी परीक्षेत किमान 40 गुण मिळवणे आवश्यक असेल.
2. लेखी परिक्षेत गुणवत्तेनूसार पात्र ठरणा-या उमेदवाराची तात्पुरती कागदपत्रे तपासणीकामी निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.तसेच कागदपत्रे तपासणी अंती अंतिम निवड यादी **संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल**.

i. लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

**ii.** तसेच परिक्षेपूर्वी संकतेस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.**सदर प्रवेशपत्रावरच उमेदवारास परिक्षेकरीता प्रवेश दिला जाईल यांची नोंद घ्यावी.**

**निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती. -**

1. लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
2. लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवारांचे जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा प्रक्रिया शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
3. उमेदवार शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्या बाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल व उमेदवाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
4. उमेदवारांचे चारित्र्य निष्कलंक असल्या बाबतचे संबांधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
5. कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध न ठेवणेबाबतचे रुपये 100 च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दिनांक 28/02/1974 नुसार महसूल सेवक (कोतवाल) म्हणून नेमणूक करतांना इतर सर्व निकष समान असतील तर त्या सजेतील पुर्वीच्या कोतवालांच्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. तसेच कोतवालांच्या वारसाव्यतिरिक्त इतर दोन उमेदवारांचे अंतिम गुण सारखे असल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 13 जुन 2018 मधील नमुद निकषावर लावला जाईल.
7. उमेदवाराने अर्ज केलेल्या सजेतील गावातील स्थानिक रहिवासी असणे आवश्यक.
8. उमेदवार कोणत्याही एकाच सजेतील स्थानिक/कायमचा रहिवासी असु शकतो सबब उमेदवाराने अशाच एका सजेत अर्ज करावा.
9. प्रत्येक सजेत केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषांनुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करताना उमेदवाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा.

10. संपुर्ण अहिल्यानगर जिल्हयात सर्व उपविभागांतील पदांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी परीक्षा घेण्यात येईल.

11. संपुर्ण भरती प्रक्रिया सजेनिहाय होणार असून कोणत्याही दोन सजेच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

12. महसूल सेवक (कोतवाल) हे पद वर्गीकृत नाही.

13. कोतवालांना क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

14. महसूल सेवक (कोतवाल) हे पद एका सजेत एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडु यासारखी समांतर आरक्षणे लागू नाही.

15. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

16. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे सन 2025-26 पर्यंत वैध असलेले नॉनक्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉनक्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रवर्गांना लागू राहील.

17. खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र.82/2001/म.से.आ- 2000/प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल.

18. **महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ २०२३/प्र.क्र.२२३/कार्या- २ दि. ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरतो निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच,**

**अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

**ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत-**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त https://nagar.govbharti.org या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND)असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर दि. 08/07/2025 ते दि. 18/07/2025 याकालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन **(online)** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे, हमीपत्रे, लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन इ. बाबी **अपलोड करणे अर्जदारास बंधनकारक राहील**. तसेच, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार मुळ कागदपत्रे पडताळणीकामी यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण

**अधिकार उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी** यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://nagar.govbharti.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
6. संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने प्रकिया शुल्क भरता येईल.

नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड /गुगल पे/फोन पे द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड /गुगल पे/फोन पे वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे व **उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग शिर्डी** यास जबाबदार असणार नाही.

7. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन https://nagar.govbharti.org संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.
8. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळे नंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहितीवर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
10. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांनाही विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.
11. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत

नसल्याचे वर्ष 31 मार्च 2026 पर्यंत वैध असलेले (अद्ययावत अर्थात 31/03/2026 पर्यत वैध असलेले )(नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

12. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक कोतवा/२०२३/प्र.क्र.१०२/ई-१०, दिनांक २ जून २०२५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमुना ‘अ’ सादर करणे बंधनकारक राहील.
13. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
14. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी /नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
15. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.
16. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
17. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने तसेच अध्यक्ष निवड समिती यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.
18. गुणवत्ता यादी प्रसिध्दीनंतर निवड समिती सुचविल तितक्या उमेदवारांची एक प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल व सदरची यादी गुणवत्ता यादी प्रसिध्दीनंतर एक वर्षा करीता वैध राहील.

**परिक्षेचे शुल्क**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | शुल्क | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
| 1 | **महसूल सेवक (कोतवाल)** | 600/- | 500/- |

(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड /गुगल पे/फोन पे द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची संपुर्ण खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग

/डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड /गुगल पे/फोन पे वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारीसं पुर्णतः उमेदवाराची आहे व उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी भाग शिर्डी यास जबाबदार असणार नाही.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 08/07/2025 (पासून)<br>ते<br>दिनांक 18/07/2025 (रात्री 23.59 पर्यंत) |
| 2 | ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 18/07/2025 |

**विशेष सूचना:-**

- **या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना उमेदवारांना अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे अर्जदार यांना जोडणे आवश्यक राहील. तसेच ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.**
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी तहसिल कार्यालय कोपरगांव या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

दिनांक :- 07/07/2025

स्वाक्षरीत/-
**सदस्य सचिव**
**तालुका निवड समिती**
**तथा तहसिलदार कोपरगांव**

स्वाक्षरीत/-
**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी**